# सोलापूर महानगरपालिका
## सभेचा इतिवृत्तांत
## (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ)
## उप-समिती बैठक क्रमांक -४९

महानगरपालिका, जा.क्र.नआ/वै/९११ मा.आयुक्त कार्यालय दि. ११.०३.२०२२ रोजीच्या मा.प्रशासकसो यांच्या आदेशाने मा.अति.आयुक्त, मा.मुख्यलेखापरिक्षक, नगरसचिव व विषयाशी संबंधित विभागाचे खातेप्रमुख/सहा.आयुक्त, यांची उप-समिती गठीत करणेत आली आहे. सदर प्रस्तावा बाबत प्रशासकीय दप्तरी ठराव करणेकामी मा.उपसमितीचे शिफारसी करिता दि.१६.०९.२०२२ रोजी बैठक क्रमांक ४८ चे कामकाज संपले नंतर मा.अति.आयुक्त यांचे कार्यालय येथे बैठक बोलाविणेत आली होती.
सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकारी/ कर्मचारी | हुद्दा |
|---|---|---|
| १ | मा.श्री.विजय खोराटे | अतिरिक्त आयुक्त |
| २ | मा.श्रीमती.रुपाली कोळी | मुख्यलेखापरिक्षक/ मुख्यलेखापाल |
| ३ | मा.श्री.प्रविण दंतकाळे | नगरसचिव |
| ४ | मा.श्री.विक्रम पाटील | सहा.आयुक्त |
| ५ | मा.श्री.श्रीराम पवार | सहा.आयुक्त |

विषय क्रमांक ९८ --

परवाना विभागाकडील महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ अन्वये कलम ४५३ खालील अनुसूचित विभाग १८ भाग १ ते ४ मध्ये नमुद केलेले व्यवसाय सुचीनुसार परवाना पात्र व्यवसायांना परवाने दिले जातात. परंतू सदरची सुची ही मर्यादित असल्याने उपविधीतील नियम २ ई मध्ये दुरुस्ती करुन सोलापूर महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून सुचीमध्ये नवीन व्यवसायांचा समावेश करुन परवाना व ना हरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. नमुद प्रस्ताव हे मा.सहा.आयुक्त यांचे कडे हार्ड कॉपीमध्ये सादर केला होता,सदर प्रस्तावचे त्यांनी अवलोकन करुन तपासून सादर करणेबाबतचे आदेश दिल्याने प्रस्ताव सादर करीत आहोत.

सोलापूर महानगरपालिकेकडे विविध व्यवसायांना परवाना देणे करीता सन १९८४ मध्ये उपविधी नियम तयार केले आहेत. सदर उपविधीस मा.शासनाने ठराव क्रं.एस.एम.सी. १०८९/७४९/सी.आर.-६४/यु.डी.२२ दिनांक ८ जून १९८४ ने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे उपविधीतील नियम क्र.२ (ई) मध्ये दुरुस्ती करुन दुरुस्तीचा प्रस्ताव मा.आयुक्त तथा प्रशासक सो.म.पा. यांचे मान्यतेने कलम ४५५ (१) (२) अन्वये मा.शासनाची मान्यता घेऊन प्रस्तावित नविन व्यवसायांना अनुषंगिक कागदपत्रे, विहीत परवाना शुल्क आणि शर्ती, अटी नियमानुसार परवाने, ना हरकत प्रमाणपत्र देणेची कार्यपध्दती आवलंबिण्यात येईल.

याबाबत कोल्हापूर महानगरपालिकेकडील परवाना विषयक कार्यपध्दतीची माहिती घेणेत आली असून त्यांनी नविन व्यवसायाचा समावेश करणेकरीता वरील कार्यपध्दती अवलंबून विविध प्रकारच्या व्यवसायांचा समावेश केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांनी केलेल्या कार्यप्रणालिची माहिती व अनुषंगिक कागदपत्रे सोबत जोडली आहेत.

सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये नव्याने विविध प्रकारच्या व्यवसायांचा परवाना पात्र सुचीमध्ये समावेश करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करणेत येत आहे.

१) यंत्र सामग्री, विज, वाफ, पाणी व विविध प्रकारची उत्पादने, टोक, किरकोळ विक्री करणारे व्यवसाय धारक

२) व्यवसायाच कोणतीही क्रिया प्रक्रिया जोडकाम, दाब देणे, पॅकींग करणे वस्तु स्वच्छ करणे, पॉलिश करणे इत्यादी इलेक्ट्रीक व मेकॅनिकल, शक्तीच्या सहाय्याने

३) वस्तु बनविणे, तयार करणे कोणत्याही शक्तीच्या सहाय्याने

४) खाद्य पदार्थ उत्पादन, टोक व किरकोळ विक्री

५) तात्पुरता परवाना व ना हरकत प्रमाणपत्र व्यवसाय प्रकार

**महाराष्ट्र प्रांतिक महा अधिनियम १९४९ चे कलम ४५४ खालील अनुसूची विभाग १८ भाग४ कलम ३१३ , ३७६,३८६, ३८७, ३९२, ४८१ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६**

अंतर्गत ना हकरत नोंदणी प्रमाणपत्र ला अनुसरुन कलम ४५४ अन्वये व्यवसायासंबंधी पुरवणी ( सप्लीमेंटरी ) अनुसूची

१) यंत्रसामग्री , वीज , वाफ , पाणी व विविध प्रकारचे उत्पादक , ठोक , किरकोळ , विक्री व्यवसायधारक , व्यवसाय प्रकार

| अ. क्र. | नवीन परवाना लागु व्यवसायाचे नांव ( १ साठा व विक्रीचे व्यवसाय) | प्रशासनाने सुचविलेले वार्षिक परवाना शुल्क | परवाना घेण्याची आवश्यकता |
|---|---|---|---|
| १ | सर्व विजेचे साहित्य , उपकरणे , रेडिओ , टी . व्ही . टेप , रेकॉर्ड , व्ही . सी . आर , व्हीडीओ , ऑडिओ सी . डी . कॅसेट व्हीडीओ कॅमेरा , कॉम्प्युटर कॅलक्युलेटर , तत्सम साठा व विक्री | ५००.०० | शॉर्ट सर्कीट होवुन जिवित व वित्त हानी होण्याचा संभाव. |
| २ | सर्व प्रकारचे स्टेशनरी बुक स्टॉल , पुस्तके , मासिक साठा व विक्री | ३५०.०० | अग्नी सुरक्षा ठेवण्याच्या दृष्टीने परवाना देणे आवश्यक |
| ३ | सर्व प्रकारचे कपडे व रेडिमेड कपडे , होजिरी, माल व साठा विक्री | ५००.०० | शॉर्ट सर्कीट होवुन जिवित व वित्त होण्याचा संभव. |
| ४ | प्रवासी बॅग , पिशव्या , लेडिज पर्स , मनी पर्स , स्कूल बॅग इत्यादी उत्पादन साठा व विक्री | ३५०.०० | शॉर्ट सर्कीट होवुन जिवित व वित्त होण्याचा संभव. |
| ५ | सर्व प्रकारचे कटलरी , नॉव्हेल्टी , विविध वस्तु , प्लॅस्टीक वस्तु , तत्सम माल व साठा विक्री | ५००.०० | प्लॅस्टिक वापरामुळे मानवी आरोग्यास व अग्नी पासून धोका निर्माण होण्याची शक्यता. |
| ६ | सर्व प्रकारच्या हार्डवेअर , माल , लोखंडी , स्टील पोलादी माल , जी . सी . पी . शिट्स सर्व प्रकारचे पत्रे व साठा व विक्री | ५००.०० | लोखंडी वस्तुमुळे मानवी आरोग्यास बाधा होण्याची शक्यता . |
| ७ | सर्व प्रकारची घड्याळे , विक्री , साठा व दुरुस्ती | ५००.०० | अग्नी सुरक्षा ठेवण्याच्या दृष्टीने परवाना देणे आवश्यक आहे |
| ८ | सर्व प्रकारचे वाहनाचे स्पेअर पार्ट , मशिनरी , यंत्र सामुग्री , साठा व विक्री | ५००.०० | सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने उपाय योजना आवश्यक |
| ९ | पी . व्ही . सी . पाईप , फिटींग्ज , होस पाईप्स रबर पाईप्स साठा व विक्री | ५००.०० | मानवी आरोग्याच्या हितास बाधा व आग लावण्याचा संभाव |
| १० | अॅल्युमिनियम , तांबा , पितळ , स्टील , चांदी , हिंडालियम इत्यादी तत्सम भांडी , वस्तु व धातु साहित्य साठा व विक्री | ५००.०० | मानवी आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता. |
| ११ | सर्व प्रकारची दुचाकी , तीन चाकी , चार चाकी वाहनांची शोरुमस साठा व विक्री | ५००.०० | वायु प्रदुषण , पेट्रोल व डिझेलचा वापर होत असल्याने अग्नीपासून धोका |
| १२ | सिमेंट, वाळू, प्लॅस्टर ऑफ पॅरिस शाडू माती साठा व विक्री | ५००.०० | केमिकल वापर असल्यामुळे प्रदुषण तसेच धुळीपासून नागरिकांचे आरोग्यास धोका |
| १३ | काड्या, ज्युट, मॅट, तयार वस्तु पी.व्ही.सी. मॅटींग्ज सर्व प्रकारचे मॅटींग्ज ताडपत्री, पी.व्ही.सी. रेग्झीन क्लॉथ, तत्सम माल साठा विक्री | ३००.०० | प्लॅस्टिक व कापडाचा वापर होत असल्याने अग्नी व वायु प्रदुषणाचा धोका |
| १४ | घरगुती गॅस शेगडी, बत्ती, उपकरणे विक्री व दुरुस्ती | ३००.०० | भयकारक व्यवसाय अग्नी व वायु प्रदुषणाचा |
| १५ | सॅनिटरी फिटींग्ज, क्रॉकरी माल, सॅनिटरी, भांडी ग्लेज्ड टाईल्स तत्सम माल उत्पादन, साठा व विक्री | ५००.०० | सिमेंट व केमिकल वापरामुळे वायु प्रदुषण यांचा साठा करतेवेळी उतरतेवेळी ध्वनी प्रदुषण वअपघाताचा संभव |
| १६ | सर्व प्रकारची वाद्य तत्सम साहित्य साठा विक्री व दुरुस्ती | ३००.०० | चमडी, लाकुड व तार यांचा वापर होत असल्यामुळे वायु व ध्वनी प्रदुषण उद्‌भवते आणि अग्निपासून धोका |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | सर्व प्रकारचे खेळाचे साहित्य, व्यायाम साहित्य साठा व विक्री व दुरुस्ती | ३००.०० | केमिकल वापर असल्यामुळे वायु प्रदुषण तसेच धुळीपासून नागरिकांचे आरोग्यास धोका |
| १८ | सर्व प्रकारची औषधे साठा व विक्री (मानवी व जनावरे) | ५००.०० | आरोग्याच्या दृष्टीने उपाय योजना असणे आवश्यक |
| १९ | नारळ साठा व विक्री | ३००.०० | नारळाच्या शेंडीपासून व त्याच्या भुश्यापासून वायु प्रदुषण होण्याचा संभव (आरोग्यास धोका) |
| २० | इमारत उपयोगी काच सामान, आरसे, अॅल्युमिनियम सेक्शन, तत्सम साहित्य साठा, विक्री | ५००.०० | अग्निपासून संरक्षण असणे जरुरीचे तसेच वायु प्रदुषणाचा धोका |
| २१ | प्लायवूड हार्डबोर्ड, सॉफ्ट बोर्ड, सनमायका, फोर मायका, तत्सम साहित्य साठा व विक्री | ५००.०० | ध्वनी, वायु प्रदुषण व साठ्याच्या ठिकाणी आग लागण्याचा संभव |
| २२ | सर्व प्रकारचे लाकडी, लोखंडी, स्टिल, प्लॅस्टिक इत्यादी चे फर्निचर तयार व विक्री | ५००.०० | ध्वनी, वायु प्रदुषण होण्याचा संभाव, अग्नि सुरक्षेच्या दृष्टीने उपाय योजना आवश्यक |
| २३ | टाईप रायटर सायक्लोस्टाईल मशिन, तत्सम वस्तु साठा व दुरुस्ती | ३००.०० | साठा असल्याने अग्निपासून संरक्षण असणे आवश्यक आहे |
| २४ | सर्व प्रकारच्या सायकल, बाबा सायकल, स्पेअर पार्ट साठा विक्री व दुरुस्ती | ३००.०० | प्लॅस्टिक व लोखंड या धातुच्या वापरामुळे ते इतरत्र विखुरलेले गेलेस मानवी आरोग्यास अपाय ठेवण्याची शक्यता व अग्निपासून संरक्षण |
| २५ | सर्व प्रकारची घरगुती क्रोकरी साहित्य, काच सामान, साठा व विक्री | ३००.०० | ध्वनी पदुषण व काच फुटल्यानंतर मानवी आरोग्यास इजा होण्याची शक्यता आहे |
| २६ | सोनार काम हत्यारे व साहित्य साठा व विक्री | ३००.०० | मानवी आरोग्याच्या दृष्टीने उपाय योजना आवश्यक |
| २७ | सोने चांदी व इतर मौल्यवान धातुपासून तयार केलेले दागिने, मुर्ती हिरे मोत्याचा माल, इमीटेशन खडे इत्यादी चे साठा विक्री व दुरुस्ती | ५००.०० | केमिकल वापरामुळे मानवी आरोग्यास धोका |
| २८ | कॅमेरे, फोटो रोल्स, फोटोग्राफीचे साहित्य, तत्सम माल साठा व विक्री व रंगीत ब्लॅक अॅन्ड व्हॉईट फोटो लॅब | ५००.०० | ज्वालाग्राही पदार्थामुळे जिवित व वित्त हानी होण्याचा संभव |
| २९ | सन गॉगल्स चष्मे साठा व विक्री | ५००.०० | अग्नी प्रतिबंधक उपाय योजना आवश्यक |
| ३० | सर्व प्रकारच्या वाहनांच्या व इतर उपाययोजनांच्या बॅटरीजचा साठा व विक्री | ५००.०० | केमिकल व अॅसिड वापरामुळे मानवी आरोग्यास धोका तसेच आग लागण्याचा संभाव |
| ३१ | दोन, तीन, चार चाकी व सर्व वाहनांच्या टायर साठा व विक्री | ५००.०० | अग्नी प्रतिबंधक उपाय योजना आवश्यक |
| ३२ | अगरबत्ती, धूप धूपकांडी तत्सम माल, साठा व विक्री | ३००.०० | रासायनिक वापर होत असल्यामुळे मानवी आरोग्याच्या दृष्टीने उपाय योजना आवश्यक |
| ३३ | टेलरींग मटेरियल, तत्सम माल साठा व विक्री टेलर्स दुकान सह | ५००.०० | इलेक्ट्रोनिक मशिनचा वापर होत असल्यामुळे शॉर्ट सर्किटने आग लागण्याचा संभाव |
| ३४ | कास्मेटीक गुडस सुवासिक अत्तरे, तत्सम माल साठा व विक्री | ३००.०० | रासायनिक व ज्वालाग्राही पदार्थाचा वापर होत असल्यामुळे अग्नी संरक्षण दृष्ट्या उपाय योजना आवश्यक आहे |
| ३५ | पान, तंबाखु विडी, काडी, सिगारेट, किरकोळ विक्री | ३५०.०० | ज्वालाग्राही असल्याने अग्नी सुरक्षा आवश्यक तसेच मानवी आरोग्यास अपायकारक |
| | पान, तंबाखु विडी, काडी, सिगारेट, | ५००.०० | |

५/७ ३/३०
३ ५ ४ ३ ४८ ३१/०/२२

| | | | |
|---|---|---|---|
| | होलसेल विक्री | | |
| ३६ | विविध प्रकारचे ब्युटी पार्लर्स व साहित्य साठा विक्री | ५००.०० | केमिकल व रासायनिक वापरामुळे आरोग्यास धोकादायक |
| ३७ | स्कुटर , ट्रॅक्टर , मोटर वगैरे वाहनांची रिपेअरी हस्त व्यवसाय | ३००.०० | पेट्रोल , डिझेल इत्यादी ज्वालाग्राही पदार्थाचा वापर त्यामुळे अग्नी संरक्षण आवश्यक आहे |
| ३८ | स्पिरीट , विविध प्रकारचे रंग , टर्पेंट ऑईल वापर इत्यादी साठा विक्री | ५००.०० | अग्नी सुरक्षा आवश्यक |
| ३९ | १)चर्मकार दुकान खाजगी इमारतीमध्ये १०० चौ . फुटा आतील | ५००.०० | अग्नी सुरक्षा आवश्यक |
| | २) चर्मकार दुकान खाजगी इमारतीमध्ये १०० चौ . फुटा वरील | ५००.०० | अग्नी सुरक्षा आवश्यक |
| | ३ ) चर्मकार दुकान रस्त्यावरील केबिनमध्ये व इतर ठिकाणी (अतिक्रमित जागा वगळून) | २५०.०० | अग्नी सुरक्षा आवश्यक |
| अ. क्र. | नवीन परवाना लागु व्यवसायाचे नांव ( 2 **व्यवससायाची कोणतीही क्रिया प्रक्रिया )** | प्रशासनाने सुचविलेले वार्षिक परवाना शुल्क | परवाना घेण्याची आवश्यकता |
| | **2) व्यवसायाच कोणतीही क्रिया प्रक्रिया जोडकाम, दाब देणे, पॅकींग करणे वस्तु स्वच्छ करणे, पॉलिश करणे इत्यादी इलेक्ट्रीक व मेकॅनिकल, शक्तीच्या सहाय्याने** | | सदर नमुद सर्व व्यवसायामध्ये विद्युत शक्तीचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याने शॉर्ट सर्किटमुळे आग लागण्याचा संभाव तसेच ध्वनी प्रदुषण, वायु प्रदुषणामुळे मानवी आरोग्यास धोका, उपाय योजना आवश्यक |
| १ | झेरॉक्स मशिनवर, कॉम्प्युटर टायपिंग मशिनवर प्रति तयार करणे व टाईप करणे | ३००.०० | |
| २ | होजिअरी तयार करणे | ५००.०० | |
| | १) धोबी विजेच्या वापरावरील | ३५०.०० | |
| | २) धोबी विजेच्या वापरावरील डिलेव्हरी शॉप सह कोळशाच्या इस्त्र्या | ३००.०० | |
| ३ | १) विषयुक्त औषध दुकाने, केमिकल्सचे उत्पादन | ५००.०० | |
| | २) विषयुक्त औषध दुकाने, केमिकल्सची विक्री | ५००.०० | |
| ४ | १) खते तयार करणेसाठी | ५००.०० | |
| | २) खते तयार विक्रीसाठी | ५००.०० | |
| ५ | कापूस पिंजणे | ३००.०० | |
| ६ | प्लंबिंग परवाना | ५००.०० | |

| अ.क्र. | नवीन परवाना लागु व्यवसायाचे नांव (३ **वस्तु बनविणे, तयार करणे कोणत्याही शक्तीच्या सहाय्याने )** | प्रशासनाने सुचविलेले वार्षिक परवाना शुल्क | परवाना घेण्याची आवश्यकता |
|---|---|---|---|
| १ | सिमेंट , वाळु , प्लॅस्टर ऑफ पॅरीस शाडु माती इत्यादी पासून निर्मिती वस्तु व मुर्ती करणे | ३००.०० | |
| २ | टी . व्ही . केबल व्यवसाय चालविणे | ५००.०० | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | मंगल कार्यालये व मल्टी पर्पज हॉल | १००००.०० | |
| ४ | एस . टी . डी . , आय . एस . डी . पी . सी . ओ बुथ चालविणे | ३००.०० | |
| ५ | मोबाईल फोन व्यवसाय चालविणे | ३००.०० | |
| ६ | वेब साईट तयार करणे व्यवसाय | १०००.०० | |
| ७ | सर्व ट्रान्सपोर्ट गुडस प्रवासी , वाहतुक कार्यालये | १०००.०० | |
| ८ | सर्व प्रकारचे व्यवसायिक क्लासेस | १०००.०० | सर्व व्यवसायापासून ध्वनी व वायु प्रदुषणामुळे मानवी आरोग्यास धोका उपाय योजना तसेच अग्नि संरक्षण आवश्यक आहे |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| ९ | संकिर्ण । छोटे व्यवसाय ( उत्पादक ठोक व किरकोळ ) गुंतवणूक रु १२ लाखा पेक्षा कमी | २५०.०० | |
| १० | संकिर्ण । मोठे व्यवसाय ( उत्पादक ठोक व किरकोळ) गुंतवणूक रु १२ लाख पेक्षाजास्त ) | ५००.०० | |

| अ.क्र. | नवीन परवाना लागू व्यवसाय नांव, खाद्य पदार्थ उत्पादक साठा, ठोक व किरकोळ विक्री व्यवसाय | | प्रशासनाने सुचविलेले वार्षिक परवाना शुल्क | परवाना घेण्याची आवश्यकता |
|---|---|---|---|---|
| १ | हॉटेल | | १०००.०० | अग्नि सुरक्षा व प्रतिबंधक उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत विद्युत शक्तीचा वापर शॉर्ट सर्किट मुळे आग लागण्याचा संभव, ध्वनि प्रदूषण, वायू प्रदूषण, केमिकल रासायनिक वापर इ.त्यामुळे उपाययोजना आवश्यक |
| २ | खानावळ | | ५००.०० | |
| ३ | खानावळ बार | | १०००.०० | |
| ४ | मास, चिकन, मासळी स्टॉल | | ५००.०० | |
| ५ | कुटलेले मसाले उत्पादन विक्री | | ५००.०० | |
| ६ | दुग्धजन्य पदार्थ (दही, दुध, तुप, लोणी इ.) उत्पादन विक्री | | ५००.०० | |
| ७ | दुध डेअरी प्रक्रिया उत्पादन व विक्री | | १०००.०० | |
| ८ | भगर, तांदूळ, पोहा, मिल उत्पादन व विक्री | | १५००.०० | |
| ९ | प्रोप्रायटरी फूड उत्पादन विक्री | | १०००.०० | |
| १० | मिनरल वॉटर उत्पादन विक्री | | १०००.०० | |
| ११ | नॉन अल्कोहोलिक बिव्हरेज उत्पादन विक्री | | ५००.०० | |
| १२ | अल्कोहोलिक बिव्हरेज उत्पादन विक्री | | १०००.०० | |
| १३ | फ्रोजन फूड प्रॉडक्टस उत्पादन व विक्री | | २०००.०० | |
| १४ | किरकोळ विक्री व्यवसाय | संकीर्ण | ५००.०० | |
| १५ | ठोक विक्री व्यवसाय | | ७५०.०० | |
| १६ | खाद्य पदार्थ उत्पादन | | १०००.०० | |

| अ.क्र. | नवीन तात्पुरते परवाने व ना हरकत प्रमाणपत्र लागू व्यवसाय नांव | प्रशासनाने सुचविलेले वार्षिक परवाना शुल्क | परवाना घेण्याची आवश्यकता |
|---|---|---|---|
| १ | मिरवणूक/शोभा यात्रा, लग्न वरात व इतर कार्यक्रमा करीता | १०००.०० | महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील तरतूदी व अग्नि सुरक्षा प्रतिबंधक उपाय योजना अंतर्गत |
| २ | उद्याने, व्यवसायिक सांस्कृतिक कामकाजासाठी देणे (शास्त्रीय गायन, कविता वाचन, व्याख्यान इ.) | ५०००.०० प्रति दिन | |
| ३ | शालेय कार्यक्रम | १०००.०० प्रति दिन | |
| ४ | उद्याने चित्रीकरण, फोटो ग्राफी साठी देणे | १००००.०० | |

वरीलप्रमाणे पाच प्रकारच्या विभागामध्ये समाविष्ट असलेल्या व्यवसाय प्रकारानुसार नव्याने समावेश करावयाची व्यवसाय सुची तयार करणेत आली आहे. तसेच अ) व्यवसायिकांनी परवाना मागणी करीता सादर करावयाची अनुषंगिक कागदपत्रे ब) अनुज्ञाप्तीसाठी अर्ज प्राप्त झाले नंतर कार्यालयाने कामकाज करणेची कार्यपध्दती क) विविध प्रकारातील व्यवसायाची परवाना शुल्क ड) परवाना हस्तांतरणाबाबत इ) अनुज्ञाप्तीतील मजकूर व परवाना शर्ती, अटी आणि नियम अशा प्रकारे नव्याने समाविष्ट होणाऱ्या परवाना पात्र व्यवसाय प्रकाराबाबत परवाने, ना हरकत प्रमाणपत्र संबंधित व्यवसायिकांना देणेकरीता कार्यालयीन कार्यपध्दती निश्चित केली आहे.

अ) परवाना मागणी करीता आवश्यक कागदपत्रे -

१) विहित नमुन्यातील अर्ज फोटो, रहिवाशी कागदपत्रे, आधार कार्ड इ.

२) मिळकतीच्या मालकी हक्क संदर्भामधील कागद (प्रॉपर्टी कार्ड / ७/१२ उतारा /इंडेक्स ३ महिन्याचे आतील ) ३) बांधकाम परवाना व झोन दाखला (रहिवाशी क्षेत्र, वाणिज्य क्षेत्र व संमिश्र क्षेत्र) विभागाचे व्यवसाय संदर्भाने ना हरकत प्रमाणपत्र

४) अग्निशामक विभागाचे व्यवसाय संदर्भाने ना हरकत प्रमाणपत्र

५) मिळकत कर /टॅक्स विभागाचे व्यवसाय संदर्भाने ना हरकत प्रमाणपत्र

६) पाणी पुरवठा विभागाचे व्यवसाय संदर्भाने ना हरकत प्रमाणपत्र

७) वाहतूक शाखा ना हरकत, पर्यावरण विभाग ना हरकत

८) जागा महापालिकेची असल्यास भूमि व मालमत्ता विभागाचे व्यवसाय संदर्भाने ना हरकत प्रमाणपत्र

९) व्यवसायाची जागा भाडे तत्वाने असलेस जागा मालकाचे प्रतिज्ञालेखाव्दारे संमतीपत्र /करारपत्र

१०) शेजारील नागरीकांचे सहमतीपत्र

११) जागेचा स्थळदर्शक नकाशा

१२) विहित नमुन्यातील प्रतिज्ञालेखव्दारे हमीपत्र

१३) व्यवसायाच्या आवश्यकतेनुसार विविध शासकिय कार्यालयाकडील आवश्यक ती कागदपत्रे उदा. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ सोलापूर यांची कंन्सेन्ट (दाखला ), अन्न व औषध प्रशासन विभाग, सोलापूर यांचा परवाना पत्र, शॉप ॲक्ट नोंदणी दाखला प्रत, कामगाराचे वैद्यकिय प्रमाणपत्र

ब) अनुज्ञप्तीसाठी अर्ज प्राप्त झालेनंतर कार्यालयाने करावयाची कारवाई. -

जागेच्या विशिष्ट हेतुसाठी वापर करण्याकरीता म.न.पा. चे ना हरकत प्रमाणपत्र व अनुज्ञप्ती मिळणेबाबत अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्जासह कागदपत्रे दाखल केल्यानंतर जागेवर समक्षतेस भेट देऊन पहाणी व तपासणी केली जाईल. सदर व्यवसायाच्या शेजारी रहाणाऱ्या नागरीकांच्या संमतीबाबत खात्री करून घेणे, जागेवरील वस्तुस्थितीबाबतचा अहवाल व तपासणी संबंधित खात्याकडील कार्यरत क.श्रे.लि., व.श्रे.लि. , आरोग्य निरीक्षक, सहा.अधिक्षक अग्नि शामक दल, ज्युनिअर इंजिनिअर इ.यांना अधिकार राहतील. सदरचे कार्यरत अधिकारी / कर्मचारी तापसणी अहवाल देतील. त्यानंतर संबंधितांना ज्या विशिष्ट वापराच्या हेतुसाठी अनुज्ञप्ती मागणी केली असेल त्या हेतुच्या अनुषंगाने नियमाप्रमाणे सादर कागदपत्राचे अवलोकन होऊन संबंधित खाते प्रमुख यांची मान्यता घेतली जाईल. सार्व. आरोग्य च्या दृष्टीने

योग्य आहे किंवा नाही हे ठरविले जाईल. त्यानंतर व्यवसायिकाकडून व्यवसाय प्रकारानुसार निर्दिष्ट केलेली विहीत शुल्क स्विकारुन परवाना, ना हरकत प्रमाणपत्र दिले जाईल.

क) व्यवसाय परवाना / नाहरकत प्रमाणपत्र शुल्क/ फी -

महा. महा. अधि.१९४९ कलम ३८६ (२) नुसार अनुज्ञप्तीचे शुल्क ठरविणेबाबत अधिकार मा. आयुक्त यांना प्राप्त आहेत. त्यानुसार सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या विविध ८३ प्रकारच्या व्यवसायांना कशाप्रकारे परवाना फी आकारणी योग्य होईल याबाबत व्यवसायांची यादी तयार करुन व्यवसाय प्रकारानुसार त्यांचे समोर परवाना शुल्क किंवा फी नमूद केली आहे. सदरची परवाना फी ही १ वर्षाची असून त्याचा कालावधी हा आर्थिक वर्षानुसार एप्रिल ते मार्च असा गृहीत धरण्यात येईल. तसेच त्याचे नूतनीकरण हे मार्च महिन्यामध्ये केले जाईल. नवीन परवाना देताना जेवढी परवाना फी असेल तितकीच रक्कम अनामत (डिपॉझिट) म्हणून भरावी लागेल. त्याचप्रमाणे परवानापात्र व्यवसायाकरीता वर उल्लेख केलेल्या परवाना मागणीच्या कागदपत्रानुसार ना हरकत प्रमाणपत्र दिले जाईल त्याची मुदत ६ महिने पर्यंत राहिल. त्यास व्यवसाय प्रकारानुसार वार्षिक निर्दिष्ट केलेले परवाना शुल्क आकारले जाईल. अनामत रक्कम ही व्यवसाय बंद केल्यानंतर सात (७) दिवसाच्या आत संबंधित व्यवसायिकानी मागणी अर्ज सादर केल्याप्रमाणे दिली जाईल. मुदती नंतर अनामत रक्कम परत दिली जाणार नाही. परवाना नुतनीकरण उशिरा केल्यास परवानाधारकास दरमहा परवाना शुल्कच्या ५ टक्के दंडात्मक रक्कम आकारली जाईल. मुदत समाप्ती नंतर एक वर्षा पर्यंत दंडात्मक शुल्क स्विकारुन परवान्याचे नुतनीकरण करुन दिले जाईल.सदर मुदतीनंतरही परवान्याचे नुतनीकरण न केल्यास व्यवसायिकाकडून नविन परवाना देताना स्विकारण्यात आलेली अनामत रक्कम (डिपॉझिट) ही परवाना शुल्क नुतनीकरण अंतर्गत जमा करुन घेतली जाईल. त्यानंतर संबंधित परवाना हा रद्द करणेत येईल. उपरोक्त नमुद व्यवसाया व्यतिरिक्त अन्य प्रकारचे व्यवसाय शहरामध्ये कार्यरत असल्यास त्यास परवाना देणे करीता संकीर्ण सदरी उत्पादक, ठोक व किरकोळ व्यवसाय शुल्क दर्शविली असून त्यानुसार परवाना शुल्क आकारणी करणेत येईल. परवाना न घेता व्यवसाय चालू असल्यास, परवाना नुतनीकरण न करता व्यवसाय चालू असल्यास व मुदतीत परवाना नुतनीकरण न केल्याने परवाना रद्द केल्यानंतर व्यवसाय चालू असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित व्यवसायिका विरुध्द तपासणी कर्मचारी/अधिकारी यांचे मार्फत प्राप्त अहवालानुसार संबंधितांविरुध्द खाते प्रमुख यांचे मान्यतेने मे.म्यु. पल कोर्टात खटले दाखल करणेची कार्यवाही अधिनियमातील तरतुदीनुसार करणेत येईल.

ड) परवाना हस्तांतरणाबाबत -

परवाना धारक मृत्यू पावल्यास त्याचे वारसदार, कौटुंबिक व वैयक्तिक कारणामुळे व्यवसाय करण्यास अपात्र असल्यास अथवा व्यवसायाची जागेसह अन्य व्यक्तीस विक्री केली असल्यास अशा वेळी व्यवसायिकाच्या नावा वरील व्यवसाय प्रकारानुसारचा परवाना संबंधितांचे नावे हस्तांतरीत करणेत येईल. अनुज्ञप्ती धारकाने स्वतः त्याचे अनुज्ञप्तीचे हस्तांतरण करणेबाबत योग्य त्या मुद्रांकावर (रु.१००) प्रतिज्ञापत्र करुन दिलेस अशी अनुज्ञप्ती त्यांनी सुचीत केलेल्या व्यक्तिच्या नावे हस्तांतरण करणे योग्य होईल. परवाना हस्तांतरासाठी ज्या व्यवसाय प्रकाराकरीता परवाना दिला आहे त्या व्यवसाय प्रकारानुसार १ वर्षाची परवाना शुल्क आकारुन खाते प्रमुख यांचे मान्यतेने परवाना हस्तांतरण केले जाईल.

इ) अनुज्ञप्तीतील मजकुर व नियम शर्ती आणि अटी –

शहरातील विविध प्रकरच्या व्यवसायांना महा. महा. अधिनियम १९४९कलम ३१३, ३७६, ३८६, ३८७, ३९२, ४८१ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ आणि प्रिव्हिशन ॲन्ड कंट्रोल ऑफ पोल्युशन ॲक्ट १९७४ व १९८१ आणि ध्वनि प्रदुषण (नियंत्रण व नियम) २००० व २०१७ अंतर्गत असलेल्या तरतुदी व नियमानुसार परवाना आणि ना हकरत प्रमाणपत्र देणेचा समावेश करणेत येईल. महा. महा. अधिनियम १९४९ चे कलम ३८६ (२) नुसार देणेत आलेल्या अनुज्ञप्तीमध्ये व सध्या प्रचलित अनुज्ञप्तीमध्ये जो मजकूर समाविष्ट आहे त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता नाही. त्या शर्ती व अटी अनुषंगिक व्यवसायांना जशाच्या तश्या लागू राहतील मात्र सदर मजकुराव्यतिरीक्त त्यामध्ये खालील शर्ती व अटींचा समावेश होणे गरजेचे आहे. सदरच्या शर्ती, अटी व कागदपत्रे ही सध्या मंजुर असलेल्या परवाना पात्र व्यवसायांना ही लागू राहतील.

१) परवाना धारण केलेली जागा म.न.पा. चे विकास नियंत्रण नियमावली/आराखड्यानुसार अंशतः अथवा पूर्णतः बाधित होत असल्यास ती म.न.पास आवश्यक असेल त्या वेळी परवाना धारकाने विनाअट म.न.पा. चे कब्जात दिली पाहिजे. अशावेळी जागा कब्जात घेतली असेल त्या आर्थिक वर्षापासून सदर परवाना रद्द समजण्यात येईल.

२) व्यवसाय ठिकाणी जिवित व वित्त हानीच्या दृष्टीकोनातून अग्नि सुरक्षा अधिनियम २००६ अंतर्गतच्या तरतुदीनुसार अग्नि सुरक्षा विषयक कयमस्वरूपी योग्य ती उपकरणे ठेवणे बंधनकारक आहे.

३) परवाना धारकाने सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने व्यवसाय जागेमध्ये व परिसरात योग्य ती व्यवस्था ठेवली पाहिजे.

४) परवाना धारकाने लिहून दिलेल्या हमीपत्रातील शर्ती व अटीस आधीन राहून परवाना दिला असे.

५) परवान्याच्या मुदतीत काही काळ धंदा बंद अगर परवाना तहकूब केला आणि त्यामुळे परवाना काढून घेतला तर परवाना काढून घेतलेल्या मुदतीची परवाना फी परत दिली जाणार नाही/ मागणार नाही.

६) सोलापूर महानगरपालिकेने सदरचा परवाना रद्द केलेस त्याविरुध्द न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार मला राहणार नाही.

७) परवाना धारण करणाऱ्या व्यवसायाची जागा रिकामी करावयाची असेल अगर पोट भाड्याने द्यावयाची असेल अगर ताबा सोडायचा असेल तर त्याप्रमाणे त्याने आपला इरादा संबंधित खात्याकडे ताबडतोब लेखी स्वरूपात कळविला पाहिजे.

८) परवाना धारण करणाऱ्याने आपला व्यवसाय अगर कृती परवान्यावर नमूद केलेल्या जागेच्या बाहेर अगर सार्वजनिक रस्त्यावर इतस्त: करु नये.

९) परवाना धारण करणाराने परवाना अधिकारी यांनी वेळोवेळी कळविल्याप्रमाणे परवाना दिलेल्या जागा मालमत्ता व आरोग्य यांना धोका किंवा उपसर्ग पोहोचणार नाही किंवा शेजारील नागरिकांना अगर जनतेला त्रास उपद्रव अथवा गैरसोय होणार नाही अशा प्रकारची योग्य व कार्यक्षम साधने वापरली पाहिजेत अगर उपाय योजना केल्या पाहिजेत.

१०) मानवी जिवितास, मालमत्तेस किंवा आरोग्यास धोका पोहोचेल अगर उपद्रव होईल. अशा रीतीने परवाना धारण करणाऱ्याने परवाना दिलेली जागा वापरली किंवा व्यवसाय चालु ठेवला असे परवाना अधिकारी यांना आढळून आल्यास सदरचा परवाना तहकूब केला जाईल.

११) परवान्यातील नियम शर्ती व अटीचे काटेकारपणे पालन करणे बंधनकारक आहे. सदर नियम शर्ती व अटीचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास व्यवसायिकाचा परवाना तहकूब व रद्द करून काढून घेण्यात येईल.

१२) व्यवसायिकांनी त्यांच्या व्यवसायाकरीता अनुषंगिक कायद्या अंतर्गतचे आवश्यक असणारे इतर शासकिय कार्यालयाकडील दाखले, ना.ह.प. इ. घेणे बंधनकारक आहे.

१३) परवाना धारण करणारास महापालिका आयुक्त यांच्या परवानगीशिवाय ज्या व्यवसायास परवान्याची आवश्यकता आहे असा दुसरा व्यवसाय अगर कृतीजागेत करता येणार नाही.

१४) म.न.पा. वेळोवेळी जी परवाना फी ठरवेल ती भरणेस मी तयार आहे. तसेच म.न.पा. ने दिलेल्या परवान्याची मुदत संपताच तो नुतनीकरण करणेचे जबाबदारी पूर्णपणे माझी राहिल. मी तसे न केलेस माझा व्यवसाय विनापरवाना समजून म.न.पास त्यावर नियमानुसार कारवाई करण्याचे अधिकार राहिल त्यावेळी सुचना अगर नोटीस देण्याची आवश्यकता नाही.

१५) खाद्य पदार्थ विषयक व अन्य परवान्यासाठी अग्नि सुरक्षा प्रतिबंधक उपाय योजना अधिनियम २००६ अंतर्गत आवश्यक ती कागदपत्रे व प्रिव्हिशन अॅन्ड कंट्रोल ऑफ पोल्युशन अॅक्ट १९७४ व १९८१ आणि ध्वनि प्रदूषण (नियंत्रण व नियम) २००० व २०१७ अंतर्गत तरतुदी नमूद नियम शर्ती व अटी बंधनकारक राहतील.

१६) परवाना पात्र व्यवसायापासून शेजारील व परिसरातील नागरिकांना ध्वनी, वायू इ. प्रदुषण विषयक उपद्रव त्रास होवू नये याबाबतच्या सर्व उपाययोजना व्यवसाय ठिकाणी करणेत याव्यात. याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास आणि त्यामध्ये तथ्य आढळून आल्यास संबंधितांचा परवाना निलंबित अथवा/रद्द करणेत येईल.

१७) तात्पुरते परवाना धारक व्यवसायिकांनी त्यांना ज्या कालावधी करीता तात्पुरता परवाना देणेत आलेला आहे, तो कालावधी समाप्ती नंतर सदरचा तात्पुरता परवाना रद्द समजणेत येईल. या परवाना धारकांनी नमुद शर्ती, अटी व नियमांचे पालन करणे बंधनकारक राहिल. तसेच तपासणीमध्ये नियमांचे पालन केले नसल्याचे संबंधित अधिकारी, कर्मचारी यांचे निदर्शनास आल्यास तात्काळ परवाना रद्दची कारवाई केली जाईल.

१८) सोलापूर महानगरपालिका प्रशासनाने वेळोवेळी आवश्यकतेनुसार आणि व्यवसाय प्रकाराप्रमाणे मागणी केलेले कागदपत्रे व शर्ती, अटी, नियम सर्व संबंधित व्यवसायिकावर बंधनकारक राहतील.

तरी उपरोक्त नमुद प्रमाणे सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये नव्याने विविध प्रकारच्या व्यवसायांना परवाना देणेची कार्यपध्दती अवलंबिणेकरीता धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. सदर निर्णयानुसार सोलापूर महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होणार आहे. शहरातील विविध प्रकारचे व्यवसाय परवानापात्र व्यवसाय कक्षेत उपविधीतील नियम क्र.२ (ई) मध्ये दुरुस्ती करुन महा. महा. अधिनियम १९४९ कलम ३१३, ३७६, ३८६, ३८७, ३९२, ४८१ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत समावेश करणे आवश्यक आहे. त्याकरीता सादर प्रस्तावातील व्यवसायाकरीता आवश्यक कागदपत्रे, अनुज्ञप्ती मागणी अर्जानुसार कार्यालयाने करावयाची कार्यवाही, व्यवसायांचे परवाना शुल्क दर, अनुज्ञ

प्ती नियम, शर्टी व अटी इत्यादी बाबत धोरणात्मक मान्यता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविणे आवश्यक आहे परंतु मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे धोरणात्मक मान्यतेस्तव पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.१३/०९/२०२२ ने आलेले प्रकरण.

निर्णय क्रमांक ९८ -- **प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक ९९**

महाराष्ट्र रिकाम्या जमिनी अधिनियम १९७५ च्या कायद्याप्रमाणे गलिच्छ वस्ती सुधारणा योजनेमध्ये जाहीर करण्यात आलेल्या झोपडपट्टीवासियांकडून सेवा आकार, भुईभाडे, प्रशासकीय कर इ. वसुल करणेबाबत शासनाने वेळोवेळी मार्गदर्शन तत्वे टरवून दिलेली आहेत. यासंदर्भामध्ये शासनाने सुधारीत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित केलेले आहेत.

मा. महाराष्ट्र शासन गृहविभाग शासन निर्णय क्रमांक गवसु १२२०/प्र.क्र. २०४(१) झोपसु-१, मंत्रालय, मुबई -३२ दिनांक ११ जूलै,२००१अन्वये दिनांक १ जानेवारी १९९५ पर्यंत अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीतील झ ोपडीधारकांना ओळखपत्र (फोटोपास) देण्याबाबत शासनाचे सुधारित धोरणाबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये पा.नं.७ वर बाब क्र.६ (ब) पात्र झोपडपट्टीवासियांना ओळखपत्र देताना दरमहा पुढीलप्रमाणे सेवाशुल्क, प्रशासकिय आकार व भुईभाडे आकारावे व ते दिनांक १-१-१९९५ पासून एकत्रित शुल्क म्हणून वसूल करण्यात यावे. यामध्ये १) सेवाशुल्क ४० टक्के २) प्रशासकीय आकार २० टक्के आणि ३) भुईभाडे ४० टक्के याप्रमाणे राहील. या एकत्रित शुल्कातील विविध बाबींची टक्केवारी खालीलप्रमाणे राहिल असे दर्शविण्यात आलेले आहे.

| ओळखपत्राचा प्रकार | क्षेत्र | नुकसान भरपाई (एकत्रित) दरमहा | शेरा |
|---|---|---|---|
| निवासी | २२५ चौ.फु. पर्यंत | रू. ५०/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रूपये ०.५० प्रति चौ. फूट दरमहा. |
| सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक | -------------------- | दरमहा रूपये ०.२५ पैसे प्रति चौ. फूट | --------- |
| संयुक्त | २२५ चौ. फूट | रूपये १००/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रूपये ०.७५ प्रति चौ. फूट दरमहा |
| अनिवासी | २२५ चौ. फुट पर्यंत | रूपये १५०/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रूपये १/- प्रति चौ. फूट दरमहा |

वर नमूद तक्त्याप्रमाणे उक्त आदेशामध्ये नमूद बाब क्र ६ क बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राव्यतिरिक्त अन्य महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील सेवाशुल्क इत्यादी यांचा दर वर नमूद केलेल्या दराच्या अनुक्रमे ५० टक्के व २५ टक्के राहील असे नमूद आहे. याचाच अर्थ बृहन्मुंबई महानगरपालिका व्यतिरिक्त महानगरपालिका क्षेत्रात ५० टक्के दर राहील असा होत आहे. त्यामुळे सोलापूर महानगरपालिकेसाठी वरील तक्त्यानुसार सेवाशुल्क इत्यादी दर निश्चित करून कार्यवाही ठेवणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२९ अन्वये वरील तीन पैकी दोन बाबी मालमत्ता करात मोडत नाहीत. त्यामुळे गवसु विभागामार्फत सदर कर वसुली करण्यात आलेली नाही.
परंतु कामाची सुसुत्रता आणि कार्यालयीन कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने सदर बाबींची कर वसूली ही आकारणी व वसुली अधिकारी (गवसु) या कार्यालयामार्फत करणे आजला मनपाच्या आर्थिक हिताच्या व नियोजनाच्यादृष्टीने योग्य वाटते. कारण प्रत्येक मिळकतींच्या बिलामध्ये या बाबीची नोंद होऊन वसूल होते. तसेच गवसु अंतर्गत ज्या मिळकतीचे कर निर्धारण अधिनियमातील तरतूदीनुसार करण्यात आले नाही. त्यांचे देखील कर निर्धारण या अगोदर मंजूर प्रचलित असलेल्या दराने आकारणी करणेस मान्यता देणे गरजेचे आहे. तसेच सदर कार्यवाही करताना उक्त अधिनियमातील कलम १५० (अ) मधील तरतूदीनुसार सहा वर्षाच्या पूर्वलक्षी प्रभावाने आकारणी करणेस मान्यतेकामी सादर करणेत येत आहे.

वरील शासन निर्णयातील बाब क्र ७ मध्ये सेवाशुल्क, भुईभाडे व प्रशासकीय आकार (एकत्रित शुल्क वसूली) बाबत झोपडपट्टीमध्ये महानगरपालिका सेवा पुरवित असल्यामुळे सेवाशुल्क त्यांनीच वसुल करून त्यांच्याकडे जमा करावे असे नमूद आहे.

दरम्यान सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ या सालाचे स्थानिक निधी लेखापरिक्षण करण्यात आले होते त्यामध्ये आक्षेपातील परिच्छेद क्र.८५ मध्ये सेवाकर व ८६ नुसार भुईभाडा, प्रशासकीय शुल्क वसूल होत नसल्याने तो वसुल करणेविषयी आक्षेपात नमूद करण्यात आलेले आहे. त्यावेळी चर्चेच्या अनुषंगाने सदरची बाब ही नगर अभियंता व भूमि व मालमत्ता विभागाशी निगडीत असल्याचे कळविणेत आले. मात्र त्याचवेळी सदर दोन्ही शुल्क हे कामाच्या सुसुत्रतेसाठी गवसु वसुली विभागाकडून करण्यात यावे असे सूचित करण्यात आलेले आहे. त्यामुळे वरील आक्षेपातील परिच्छेद क्र.८६ नुसार सन दिनांक १-४-२०१५ पासून प्रशासकीय कर,भुईभाडे वरील तक्त्यात नमूदप्रमाणे वसुल करणेस मान्यता देणे तसेच आक्षेपातील परिच्छेद क्र. ८५ नुसार ज्या मिळकतदारांकडून फक्त सेवाकर वसूल करण्यात येते त्यांना या करासोबत नियमानुसार प्रचलित दराने कराची आकारणी करणेस तसेच ज्या मिळकतदारांना नियमानुसार कराची आकारणी चालू आहे त्यांना मागील तक्त्यात नमूद प्रमाणे एकत्रित शुल्क दि.०१/०४/२०१५ पासून लागू करणेस, तसेच ज्या मिळकतीचे कर निर्धारण झालले नाही त्याचे नव्याने कर निर्धारण करणेस महराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५० (अ) नुसार सहा वर्षाच्या पूर्व लक्षी प्रभावाने आकारणी करणेस प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभा कडे मान्यतेस्तव पाठविणे आवश्यक आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांच्याकडे मान्यतेस्तव पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.१६/०९/२०२२ ने आलेले प्रकरण.

निर्णय क्रमांक ९९ -- **प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रत्येक झोपडपट्टीचे मोजमाप करून त्यामध्ये शासकिय जागा, खाजगी जागा, मनपाचे जागेवर असलेल्या झोपड्यांची विभागणी करून पूरवणी बिले देण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

मा.सहा.आयुक्त -४
सोलापूर महानगरपालिका

मा.सहा.आयुक्त (कर आकारणी)
सोलापूर महानगरपालिका

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

मा.मुख्यलेखापरिक्षक
सोलापूर महानगरपालिका

मा.अति.आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

५१० ३०/९०
३५ ७ ३ ५ २ २/०१/२२

**सोलापूर महानगरपालिका**

**प्रशासक ठराव**

**विषय क्र.९८ ठराव क्र.९८ दिनांक. १६/०९/२०२२**

**(मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )**



परवाना विभागाकडील महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ अन्वये कलम ४५३ खालील अनुसूचित विभाग १८ भाग १ ते ४ मध्ये नमुद केलेले व्यवसाय सुचीनुसार परवाना पात्र व्यवसायांना परवाने दिले जातात. परंतू सदरची सुची ही मर्यादित असल्याने उपविधीतील नियम २ ई मध्ये दुरुस्ती करुन सोलापूर महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून सुचीमध्ये नवीन व्यवसायांचा समावेश करुन परवाना व ना हरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

सोलापूर महानगरपालिकेकडे विविध व्यवसायांना परवाना देणे करीता सन १९८४ मध्ये उपविधी नियम तयार केले आहेत. सदर उपविधीस मा.शासनाने ठराव क्रं.एस.एम.सी. १०८१/७४१/सी.आर.-६४/यु.डी.२२ दिनांक ८ जून १९८४ ने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे उपविधीतील नियम क्र.२ (ई) मध्ये दुरुस्ती करुन दुरुस्तीचा प्रस्ताव मा.आयुक्त तथा प्रशासक सो.म.पा. यांचे मान्यतेने कलम ४५५ (१) (२) अन्वये मा.शासनाची मान्यता घेऊन प्रस्तावित नविन व्यवसायांना अनुषंगिक कागदपत्रे, विहीत परवाना शुल्क आणि शर्ती, अटी नियमानुसार परवाने, ना हरकत प्रमाणपत्र देणेची कार्यपध्दती आवलंबिण्यात येईल.

याबाबत कोल्हापूर महानगरपालिकेकडील परवाना विषयक कार्यपध्दतीची माहिती घेणेत आली असून त्यांनी नविन व्यवसायाचा समावेश करणेकरीता वरील कार्यपध्दती अवलंबून विविध प्रकारच्या व्यवसायांचा समावेश केल्याचे निदर्शनास आले आहे.

सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये नव्याने विविध प्रकारच्या व्यवसायांचा परवाना पात्र सुचीमध्ये समावेश करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करणेत येत आहे.

१) यंत्र सामग्री, विज, वाफ, पाणी व विविध प्रकारची उत्पादने, ठोक, किरकोळ विक्री करणारे व्यवसाय धारक

२) व्यवसायाच कोणतीही क्रिया प्रक्रिया जोडकाम, दाब देणे, पॅकींग करणे वस्तु स्वच्छ करणे, पॉलिश करणे इत्यादी इलेक्ट्रीक व मेकॅनिकल, शक्तीच्या सहाय्याने

३) वस्तु बनविणे, तयार करणे कोणत्याही शक्तीच्या सहाय्याने

४) खाद्य पदार्थ उत्पादन, ठोक व किरकोळ विक्री

५) तात्पुरता परवाना व ना हरकत प्रमाणपत्र व्यवसाय प्रकार

**महाराष्ट्र प्रांतिक महा अधिनियम १९४९ चे कलम ४५४ खालील अनुसूची विभाग १८ भाग४ कलम ३१३ , ३७६,३८६, ३८७, ३९२, ४८१ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत ना हकरत नोंदणी प्रमाणपत्र ला अनुसरुन कलम ४५४ अन्वये व्यवसायासंबंधी पुरवणी ( सप्लीमेंटरी ) अनुसूची**

**१)** यंत्रसामग्री , वीज , वाफ , पाणी व विविध प्रकारचे उत्पादक , ठोक , किरकोळ , विक्री व्यवसायधारक , व्यवसाय प्रकार

| अ. क्र. | नवीन परवाना लागु व्यवसायाचे नांव ( १ साठा व विक्रीचे व्यवसाय) | प्रशासनाने सुचविलेले वार्षिक परवाना शुल्क | परवाना घेण्याची आवश्यकता |
|---|---|---|---|
| १ | सर्व विजेचे साहित्य , उपकरणे , रेडिओ , टी . व्ही . टेप , रेकॉर्ड , व्ही . सी . आर , व्हीडीओ , ऑडिओ सी . डी . कॅसेट व्हीडीओ कॅमेरा , कॉम्प्युटर कॅलक्युलेटर , तत्सम साठा व विक्री | ५००.०० | शॉर्ट सर्किट होवुन जिवित व वित्त हानी होण्याचा संभाव. |
| २ | सर्व प्रकारचे स्टेशनरी बुक स्टॉल , पुस्तके , मासिक साठा व विक्री | ३५०.०० | अग्नी सुरक्षा ठेवण्याच्या दृष्टीने परवाना देणे आवश्यक |
| ३ | सर्व प्रकारचे कपडे व रेडिमेड कपडे , होजिरी, माल व साठा विक्री | ५००.०० | शॉर्ट सर्किट होवुन जिवित व वित्त होण्याचा संभव. |
| ४ | प्रवासी बॅग्ज , पिशव्या , लेडिज पर्स , मनी पर्स , स्कूल बॅग्ज इत्यादी उत्पादन साठा व विक्री | ३५०.०० | शॉर्ट सर्किट होवुन जिवित व वित्त होण्याचा संभव. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | सर्व प्रकारचे कटलरी, नॉव्हेल्टी, विविध वस्तु, प्लॅस्टीक वस्तु, तत्सम माल व साठा विक्री | ५००.०० | प्लॅस्टिक वापरामुळे मानवी आरोग्यास व अग्नी पासून धोका निर्माण होण्याची शक्यता. |
| ६ | सर्व प्रकारच्या हार्डवेअर, माल, लोखंडी, स्टील पोलादी माल, जी. सी. पी. शिट्स सर्व प्रकारचे पत्रे व साठा व विक्री | ५००.०० | लोखंडी वस्तुमुळे मानवी आरोग्यास बाधा होण्याची शक्यता. |
| ७ | सर्व प्रकारची घड्याळे, विक्री, साठा व दुरुस्ती | ५००.०० | अग्नी सुरक्षा ठेवण्याच्या दृष्टीने परवाना देणे आवश्यक आहे |
| ८ | सर्व प्रकारचे वाहनाचे स्पेअर पार्ट, मशिनरी, यंत्र सामुग्री, साठा व विक्री | ५००.०० | सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने उपाय योजना आवश्यक |
| ९ | पी. व्ही. सी. पाईप, फिटींग्ज, होस पाईप्स रबर पाईप्स साठा व विक्री | ५००.०० | मानवी आरोग्याच्या हितास बाधा व आग लागण्याचा संभाव |
| १० | ॲल्युमिनियम, तांबा, पितळ, स्टील, चांदी, हिंडालियम इत्यादी तत्सम भांडी, वस्तु व धातु साहित्य साठा व विक्री | ५००.०० | मानवी आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता. |
| ११ | सर्व प्रकारची दुचाकी, तीन चाकी, चार चाकी वाहनांची शोरुमस साठा व विक्री | ५००.०० | वायु प्रदुषण, पेट्रोल व डिझेलचा वापर होत असल्याने अग्नीपासून धोका |
| १२ | सिमेंट, वाळू, प्लॅस्टर ऑफ पॅरिस शाडू माती साठा व विक्री | ५००.०० | केमिकल वापर असल्यामुळे प्रदुषण तसेच धुळीपासून नागरिकांचे आरोग्यास धोका |
| १३ | कापडा, ज्युट, मॅट, तयार वस्तू पी.व्ही.सी. मॅटींग्ज सर्व प्रकारचे मॅटीग्ज ताडपत्री, पी.व्ही.सी. रेग्झीन क्लॉथ, तत्सम माल साठा विक्री | ३००.०० | प्लॅस्टिक व कापडाचा वापर होत असल्याने अग्नी व वायु प्रदुषणाचा धोका |
| १४ | घरगुती गॅस शेगडी, बत्ती, उपकरणे विक्री व दुरुस्ती | ३००.०० | भयकारक व्यवसाय अग्नी व वायु प्रदुषणाचा |
| १५ | सॅनिटरी फिटींग्ज, क्रोकरी माल, सॅनिटरी, भोडी ग्लज्ड टाईल्स तत्सम माल उत्पादन, साठा व विक्री | ५००.०० | सिमेंट व केमिकल वापरामुळे वायु प्रदुषण यांचा साठा करतेवेळी उतरतेवेळी ध्वनी प्रदुषण व अपघाताचा संभव |
| १६ | सर्व प्रकारची वाद्ये तत्सम साहित्य साठा विक्री व दुरुस्ती | ३००.०० | चमडी, लाकूड व तार यांचा वापर होत असल्यामुळे वायु व ध्वनी प्रदुषण उद्भवते आणि अग्निपासून धोका |
| १७ | सर्व प्रकारचे खेळाचे साहित्य, व्यायाम साहित्य साठा व विक्री व दुरुस्ती | ३००.०० | केमिकल वापर असल्यामुळे वायु प्रदुषण तसेच धुळीपासून नागरिकांचे आरोग्यास धोका |
| १८ | सर्व प्रकारची औषधे साठा व विक्री (मानवी व जनावरे) | ५००.०० | आरोग्याच्या दृष्टीने उपाय योजना असणे आवश्यक |
| १९ | नारळ साठा व विक्री | ३००.०० | नारळाच्या शेंडीपासून व त्याच्या भुग्यापासून वायु प्रदुषण होण्याचा संभव (आरोग्यास धोका) |
| २० | इमारत उपयोगी काच सामान, आरसे, ॲल्युमिनियम सेक्शन, तत्सम साहित्य साठा, विक्री | ५००.०० | अग्निपासून संरक्षण असणे जरुरीचे तसेच वायु प्रदुषणाचा धोका |
| २१ | प्लायवूड हार्डबोर्ड, सॉफ्ट बोर्ड, सनमायका, फोर मायका, तत्सम साहित्य साठा व विक्री | ५००.०० | ध्वनी, वायु प्रदुषण व साठ्याच्या ठिकाणी आग लागण्याचा संभव |
| २२ | सर्व प्रकारचे लाकडी, लोखंडी, स्टिल, प्लॅस्टिक इत्यादी चे फर्निचर तयार व विक्री | ५००.०० | ध्वनी, वायु प्रदुषण होण्याचा संभाव, अग्नि सुरक्षेच्या दृष्टीने उपाय योजना आवश्यक |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | टाईप रायटर सायक्लोस्टाईल मशिन, तत्सम वस्तु साठा व दुरुस्ती | ३००,०० | साठा असल्याने अग्निपासून संरक्षण असणे आवश्यक आहे |
| २४ | सर्व प्रकारच्या सायकल, बाबा सायकल, स्पेअर पार्ट साठा विक्री व दुरुस्ती | ३००,०० | प्लॅस्टिक व लोखंड या धातुच्या वापरामुळे ते इतरत्र विखुरलेले गेलेस मानवी आरोग्यास अपाय ठेवण्याची शक्यता व अग्निपासून संरक्षण |
| २५ | सर्व प्रकारची घरगुती क्रोकरी साहित्य, काच सामान, साठा व विक्री | ३००,०० | ध्वनी प्रदुषण व काच फुटल्यानंतर मानवी आरोग्यास इजा होण्याची शक्यता आहे |
| २६ | सोनार काम हत्यारे व साहित्य साठा व विक्री | ३००,०० | मानवी आरोग्याच्या दृष्टीने उपाय योजना आवश्यक |
| २७ | सोने चांदी व इतर मौल्यवान धातुपासून तयार केलेले दागिने , मुर्ती हिरे मोत्याचा माल , इमीटेशन खडे इत्यादी चे साठा विक्री व दुरुस्ती | ५००,०० | केमिकल वापरामुळे मानवी आरोग्यास धोका |
| २८ | कॅमेरे , फोटो रोल्स , फोटोग्राफीचे साहित्य , तत्सम माल साठा व विक्री व रंगीत ब्लॅक अॅन्ड व्हाईट फोटो लॅब | ५००,०० | ज्वालाग्राही पदार्थामुळे जिवित व वित्त हानी होण्याचा संभव |
| २९ | सन गॉगल्स चष्मे साठा व विक्री | ५००,०० | अग्नी प्रतिबंधक उपाय योजना आवश्यक |
| ३० | सर्व प्रकारच्या वाहनांच्या व इतर उपाययोजनांच्या बॅटरीजचा साठा व विक्री | ५००,०० | केमिकल व अॅसिड वापरामुळे मानवी आरोग्यास धोका तसेच आग लागण्याचा संभाव |
| ३१ | दोन , तीन , चार चाकी व सर्व वाहनांच्या टायर साठा व विक्री | ५००,०० | अग्नी प्रतिबंधक उपाय योजना आवश्यक |
| ३२ | अगरबत्ती , धुप धुपकांडी तत्सम माल , साठा व विक्री | ३००,०० | रासायनिक वापर होत असल्यामुळे मानवी आरोग्याच्या दृष्टीने उपाय योजना आवश्यक |
| ३३ | टेलरींग मटेरियल , तत्सम माल साठा व विक्री टेलर्स दुकान सह | ५००,०० | इलेक्ट्रीक मशिनचा वापर होत असल्यामुळे शॉर्ट सर्किटने आग लागण्याचा संभाव |
| ३४ | कास्मेटीक गुडस सुवासिक अत्तरे , तत्सम माल साठा व विक्री | ३००,०० | रासायनिक व ज्वालाग्राही पदार्थाचा वापर होत असल्यामुळे अग्नी संरक्षण दृष्टया उपाय योजना आवश्यक आहे |
| ३५ | पान , तंबाखु विडी , काडी , सिगारेट , किरकोळ विक्री | ३५०,०० | ज्वालाग्राही असल्याने अग्नी सुरक्षा आवश्यक तसेच मानवी आरोग्यास अपायकारक |
| | पान , तंबाखु विडी , काडी , सिगारेट , होलसेल विक्री | ५००,०० | |
| ३६ | विविध प्रकारचे ब्युटी पार्लर्स व साहित्य साठा विक्री | ५००,०० | केमिकल व रासायनिक वापरामुळे आरोग्यास धोकादायक |
| ३७ | स्कुटर , ट्रॅक्टर , मोटर वगैरे वाहनांची रिपेअरी हस्त व्यवसाय | ३००,०० | पेट्रोल , डिझेल इत्यादी ज्वालाग्राही पदार्थाचा वापर त्यामुळे अग्नी संरक्षण आवश्यक आहे |
| ३८ | स्पिरीट , विविध प्रकारचे रंग , टर्पेंट ऑईल वापर इत्यादी साठा विक्री | ५००,०० | अग्नी सुरक्षा आवश्यक |
| ३९ | १)चर्मकार दुकान खाजगी इमारतीमध्ये १०० चौ . फुटा आतील | ५००,०० | अग्नी सुरक्षा आवश्यक |

| | | | |
|---|---|---|---|
| | २) चर्मकार दुकान खाजगी इमारतीमध्ये १०० चौ. फुटा वरील | ५००.०० | अग्नी सुरक्षा आवश्यक |
| | ३ ) चर्मकार दुकान रस्त्यावरील केबिनमध्ये व इतर ठिकाणी (अतिक्रमित जागा वगळून) | २५०.०० | अग्नी सुरक्षा आवश्यक |

| अ. क्र. | नवीन परवाना लागु व्यवसायाचे नांव ( 2 **व्यवससायाची कोणतीही क्रिया प्रक्रिया** ) | प्रशासनाने सुचविलेले वार्षिक परवाना शुल्क | परवाना घेण्याची आवश्यकता |
|---|---|---|---|
| | 2) व्यवसायाच कोणतीही क्रिया प्रक्रिया **जोडकाम, दाब देणे, पॅकींग करणे वस्तु स्वच्छ करणे, पॉलिश करणे इत्यादी इलेक्ट्रीक व मेकॅनिकल, शक्तीच्या सहाय्याने** | | सदर नमुद सर्व व्यवसायामध्ये विद्युत शक्तीचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याने शॉर्ट सर्किटमुळे आग लागण्याचा संभाव तसेच ध्वनी प्रदुषण, वायु प्रदुषणामुळे मानवी आरोग्यास धोका, उपाय योजना आवश्यक |
| १ | झेरॉक्स मशिनवर, कॉम्प्युटर टायपिंग मशिनवर प्रति तयार करणे व टाईप करणे | ३००.०० | |
| २ | हॉजिअरी तयार करणे | ५००.०० | |
| | १) धोबी विजेच्या वापरावरील | ३५०.०० | |
| | २) धोबी विजेच्या वापरावरील डिलेव्हरी शॉप सह कोळशाच्या इस्त्र्या | ३००.०० | |
| ३ | १) विषयुक्त औषध दुकाने, केमिकल्सचे उत्पादन | ५००.०० | |
| | २) विषयुक्त औषध दुकाने, केमिकल्सची विक्री | ५००.०० | |
| ४ | १) खते तयार करणेसाठी | ५००.०० | |
| | २) खते तयार विक्रीसाठी | ५००.०० | |
| ५ | कापूस पिंजणे | ३००.०० | |
| ६ | प्लंबिंग परवाना | ५००.०० | |

| अ.क्र. | नवीन परवाना लागु व्यवसायाचे नांव **(३ वस्तु बनविणे, तयार करणे कोणत्याही शक्तीच्या सहाय्याने )** | प्रशासनाने सुचविलेले वार्षिक परवाना शुल्क | परवाना घेण्याची आवश्यकता |
|---|---|---|---|
| १ | सिमेंट , वाळु , प्लॅस्टर ऑफ पॅरीस शाडू माती इत्यादी पासून निर्मिती वस्तु व मुर्ती करणे | ३००.०० | |
| २ | टी. व्ही. केबल व्यवसाय चालविणे | ५००.०० | |
| ३ | मंगल कार्यालये व मल्टी पर्पज हॉल | १००००.०० | |
| ४ | एस . टी . डी ., आय . एस . डी . पी . सी . ओ बुथ चालविणे | ३००.०० | |
| ५ | मोबाईल फोन व्यवसाय चालविणे | ३००.०० | |
| ६ | वेब साईट तयार करणे व्यवसाय | १०००.०० | |
| ७ | सर्व ट्रान्सपोर्ट गुडस प्रवासी , वाहतुक कार्यालये | १०००.०० | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | सर्व प्रकारचे व्यवसायिक क्लासेस | १०००.०० | सर्व व्यवसायापासून ध्वनी व वायू प्रदुषणामुळे मानवी आरोग्यास धोका उपाय योजना तसेच अग्नि संरक्षण आवश्यक आहे |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| ९ | संकिर्ण । छोटे व्यवसाय ( उत्पादक ठोक व किरकोळ ) गुंतवणूक रु १२ लाखा पेक्षा कमी | २५०.०० | |
| १० | संकिर्ण । मोठे व्यवसाय ( उत्पादक ठोक व किरकोळ) गुंतवणूक रु १२ लाख पेक्षाजास्त ) | ५००.०० | |

| अ.क्र. | नवीन परवाना लागू व्यवसाय नांव, खाद्य पदार्थ उत्पादक साठा, ठोक व किरकोळ विक्री व्यवसाय | | प्रशासनाने सुचविलेले वार्षिक परवाना शुल्क | परवाना घेण्याची आवश्यकता |
|---|---|---|---|---|
| १ | हॉटेल | | १०००.०० | अग्नि सुरक्षा व प्रतिबंधक उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत विद्युत शक्तीचा वापर शॉर्ट सर्किट मुळे आग लागण्याचा संभव, ध्वनि प्रदुषण, वायू प्रदुषण, केमिकल रासायनिक वापर इ.त्यामुळे उपाययोजना आवश्यक |
| २ | खानावळ | | ५००.०० | |
| ३ | खानावळ बार | | १०००.०० | |
| ४ | मास, चिकन, मासळी स्टॉल | | ५००.०० | |
| ५ | कुटलेले मसाले उत्पादन विक्री | | ५००.०० | |
| ६ | दुग्धजन्य पदार्थ (दही, दुध, तुप, लोणी इ.) उत्पादन विक्री | | ५००.०० | |
| ७ | दुध डेअरी प्रक्रिया उत्पादन व विक्री | | १०००.०० | |
| ८ | भगर, तांदूळ, पोहा, मिल उत्पादन व विक्री | | १५००.०० | |
| ९ | प्रॉप्रायटरी फूड उत्पादन विक्री | | १०००.०० | |
| १० | मिनरल वॉटर उत्पादन विक्री | | १०००.०० | |
| ११ | नॉन अल्कोहोलिक बिव्हरेज उत्पादन विक्री | | ५००.०० | |
| १२ | अल्कोहोलिक बिव्हरेज उत्पादन विक्री | | १०००.०० | |
| १३ | फ्रोजन फुड प्रॉडक्टस उत्पादन व विक्री | | २०००.०० | |
| १४ | किरकोळ विक्री व्यवसाय | संकीर्ण | ५००.०० | |
| १५ | ठोक विक्री व्यवसाय | | ७५०.०० | |
| १६ | खाद्य पदार्थ उत्पादन | | १०००.०० | |

| अ.क्र. | नवीन तात्पुरते परवाने व ना हरकत प्रमाणपत्र लागू व्यवसाय नांव | प्रशासनाने सुचविलेले वार्षिक परवाना शुल्क | परवाना घेण्याची आवश्यकता |
|---|---|---|---|
| १ | मिरवणूक/शोभा यात्रा, लग्न वरात व इतर कार्यक्रमा करीता | १०००.०० | महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील तरतुदी व अग्नि सुरक्षा प्रतिबंधक उपाय योजना अंतर्गत |
| २ | उद्याने, व्यवसायिक सांस्कृतिक कामकाजासाठी देणे (शास्त्रीय गायन, कविता वाचन, व्याख्यान इ.) | ५०००.०० प्रति दिन | |
| ३ | शालेय कार्यक्रम | १०००.०० प्रति दिन | |
| ४ | उद्याने चित्रीकरण, फोटो ग्राफी साठी देणे | १००००.०० | |

वरीलप्रमाणे पाच प्रकारच्या विभागामध्ये समाविष्ट असलेल्या व्यवसाय प्रकारानुसार नव्याने समावेश करावयाची व्यवसाय सुची तयार करणेत आली आहे. तसेच अ) व्यवसायिकांनी परवाना मागणी करीता सादर करावयाची अनुषंगिक कागदपत्रे ब) अनुज्ञप्तीसाठी अर्ज प्राप्त झाले नंतर कार्यालयाने कामकाज करणेची कार्यपध्दती क) विविध प्रकारातील व्यवसायाची परवाना शुल्क ड) परवाना हस्तांतरणाबाबत इ) अनुज्ञप्तीतील मजकूर व परवाना शर्ती, अटी आणि नियम अशा प्रकारे नव्याने समाविष्ट होणाऱ्या परवाना पात्र व्यवसाय प्रकाराबाबत परवाने, ना हरकत प्रमाणपत्र संबंधित व्यवसायिकांना देणेकरीता कार्यालयीन कार्यपध्दती निश्चित केली आहे.

अ) परवाना मागणी करीता आवश्यक कागदपत्रे -

१) विहित नमुन्यातील अर्ज फोटो, रहिवाशी कागदपत्रे, आधार कार्ड इ.

२) मिळकतीच्या मालकी हक्क संदर्भामधील कागद (प्रॉपर्टी कार्ड / ७/१२ उतारा /इंडेक्स ३ महिन्याचे आतील ) ३) बांधकाम परवाना व झोन दाखला (रहिवाशी क्षेत्र, वाणिज्य क्षेत्र व संमिश्र क्षेत्र) विभागाचे व्यवसाय संदर्भाने ना हरकत प्रमाणपत्र

४) अग्निशामक विभागाचे व्यवसाय संदर्भाने ना हरकत प्रमाणपत्र

५) मिळकत कर /टॅक्स विभागाचे व्यवसाय संदर्भाने ना हरकत प्रमाणपत्र

६) पाणी पुरवठा विभागाचे व्यवसाय संदर्भाने ना हरकत प्रमाणपत्र

७) वाहतूक शाखा ना हरकत, पर्यावरण विभाग ना हरकत

८) जागा महापालिकेची असल्यास भूमि व मालमत्ता विभागाचे व्यवसाय संदर्भाने ना हरकत प्रमाणपत्र

९) व्यवसायाची जागा भाडे तत्वाने असलेस जागा मालकाचे प्रतिज्ञालेखाव्दारे संमतीपत्र /करारपत्र

१०) शेजारील नागरीकांचे सहमतीपत्र

११) जागेचा स्थळदर्शक नकाशा

१२) विहित नमुन्यातील प्रतिज्ञालेखाव्दारे हमीपत्र

१३) व्यवसायाच्या आवश्यकतेनुसार विविध शासकिय कार्यालयाकडील आवश्यक ती कागदपत्रे उदा. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ सोलापूर यांची कन्सेन्ट (दाखला ), अन्न व औषध प्रशासन विभाग, सोलापूर यांचा परवाना पत्र, शॉप ॲक्ट नोंदणी दाखला प्रत, कामगाराचे वैद्यकिय प्रमाणपत्र

ब) अनुज्ञप्तीसाठी अर्ज प्राप्त झालेनंतर कार्यालयाने करावयाची कारवाई. -

जागेच्या विशिष्ट हेतुसाठी वापर करण्याकरीता म.न.पा. चे ना हरकत प्रमाणपत्र व अनुज्ञप्ती मिळणेबाबत अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्जासह कागदपत्रे दाखल केल्यानंतर जागेवर समक्षतेस भेट देऊन पहाणी व तपासणी केली जाईल. सदर व्यवसायाच्या शेजारी रहाणाऱ्या नागरीकांच्या संमतीबाबत खात्री करुन घेणे. जागेवरील वस्तुस्थितीबाबतचा अहवाल व तपासणी संबंधित खात्याकडील कार्यरत क.श्रे.लि., व.श्रे.लि., आरोग्य निरीक्षक, सहा.अधिक्षक अग्नि शामक दल, ज्युनिअर इंजिनिअर इ.यांना अधिकार राहतील. सदरचे कार्यरत अधिकारी / कर्मचारी तापसणी अहवाल देतील. त्यानंतर संबंधितांना ज्या विशिष्ट वापराच्या हेतुसाठी अनुज्ञप्ती मागणी केली असेल त्या हेतुच्या अनुषंगाने नियमाप्रमाणे सादर कागदपत्राचे अवलोकन होऊन संबंधित खाते प्रमुख यांची मान्यता घेतली जाईल. मार्व. आरोग्य च्या दृष्टीने योग्य आहे किंवा नाही हे ठरविले जाईल. त्यानंतर व्यवसायिकाकडून व्यवसाय प्रकारानुसार निर्दिष्ट केलेली विहीत शुल्क स्विकारुन परवाना, ना हरकत प्रमाणपत्र दिले जाईल.

क) व्यवसाय परवाना / नाहरकत प्रमाणपत्र शुल्क/ फी -

महा. महा. अधि.१९४९ कलम ३८६ (२) नुसार अनुज्ञमीचे शुल्क ठरविणेबाबत अधिकार मा. आयुक्त यांना प्राप्त आहेत. त्यानुसार सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या विविध ८३ प्रकारच्या व्यवसायांना कशाप्रकारे परवाना फी आकारणी योग्य होईल याबाबत व्यवसायांची यादी तयार करुन व्यवसाय प्रकारानुसार त्यांचे समोर परवाना शुल्क किंवा फी नमूद केली आहे. सदरची परवाना फी ही १ वर्षाची असून त्याचा कालावधी हा आर्थिक वर्षानुसार एप्रिल ते मार्च असा गृहीत धरण्यात येईल. तसेच त्याचे नूतनीकरण हे मार्च महिन्यामध्ये केले जाईल. नवीन परवाना देताना जेवढी परवाना फी असेल तितकीच रक्कम अनामत (डिपॉझिट) म्हणून भरावी लागेल. त्याचप्रमाणे परवानापात्र व्यवसायाकरीता वर उल्लेख केलेल्या परवाना मागणीच्या कागदपत्रानुसार ना हरकत प्रमाणपत्र दिले जाईल त्याची मुदत ६ महिने पर्यंत राहिल. त्यास व्यवसाय प्रकारानुसार वार्षिक निर्दिष्ट केलेले परवाना शुल्क आकारले जाईल. अनामत रक्कम ही व्यवसाय बंद केल्यानंतर सात (७) दिवसाच्या आत संबंधित व्यवसायिकानी मागणी अर्ज सादर केल्याप्रमाणे दिली जाईल. मुदती नंतर अनामत रक्कम परत दिली जाणार नाही. परवाना नुतनीकरण उशिरा केल्यास परवानाधारकास दरमहा परवाना शुल्कच्या ५ टक्के दंडात्मक रक्कम आकारली जाईल. मुदत समाप्ती नंतर एक वर्षा पर्यंत दंडात्मक शुल्क स्विकारुन परवान्याचे नुतनीकरण करुन दिले जाईल.सदर मुदतीनंतरही परवान्याचे नुतनीकरण न केल्यास व्यवसायिकाकडून नविन परवाना देताना स्विकारण्यात आलेली अनामत रक्कम (डिपॉझिट) ही परवाना शुल्क नुतनीकरण अंतर्गत जमा करुन घेतली जाईल. त्यानंतर संबंधित परवाना हा रद्द करणेत येईल. उपरोक्त नमुद व्यवसाया व्यतिरिक्त अन्य प्रकारचे व्यवसाय शहरामध्ये कार्यरत असल्यास त्यास परवाना देणे करीता संकीर्ण सदरी उत्पादक, ठोक व किरकोळ व्यवसाय शुल्क दर्शविली असून त्यानुसार परवाना शुल्क आकारणी करणेत येईल. परवाना न घेता व्यवसाय चालू असल्यास, परवाना नुतनीकरण न करता व्यवसाय चालू असल्यास व मुदतीत परवाना नुतनीकरण न केल्याने परवाना रद्द केल्यानंतर व्यवसाय चालू असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित व्यवसायिका विरुध्द तपासणी कर्मचारी/अधिकारी यांचे मार्फत प्राप्त अहवालानुसार संबंधितांविरुध्द खाते प्रमुख यांचे मान्यतेने मे.म्यु. पल कोर्टात खटले दाखल करणेची कार्यवाही अधिनियमातील तरतुदीनुसार करणेत येईल.

ड) परवाना हस्तांतरणाबाबत -

परवाना धारक मृत्यू पावल्यास त्याचे वारसदार, कौटूंबिक व वैयक्तिक कारणामुळे व्यवसाय करण्यास अपात्र असल्यास अथवा व्यवसायाची जागेसह अन्य व्यक्तीस विक्री केली असल्यास अशा वेळी व्यवसायिकाच्या नावा वरील व्यवसाय प्रकारानुसारचा परवाना संबंधितांचे नावे हस्तांतरीत करणेत येईल. अनुज्ञमी धारकाने स्वतः त्याचे अनुज्ञमीचे हस्तांतरण करणेबाबत योग्य त्या मुद्रांकावर (रु.१००) प्रतिज्ञापत्र करुन दिलेस अशी अनुज्ञमी त्यांनी सुचीत केलेल्या व्यक्तिच्या नावे हस्तांतरण करणे योग्य होईल. परवाना हस्तांतरासाठी ज्या व्यवसाय प्रकाराकरीता परवाना दिला आहे त्या व्यवसाय प्रकारानुसार १ वर्षाची परवाना शुल्क आकारुन खाते प्रमुख यांचे मान्यतेने परवाना हस्तांतरण केले जाईल.

इ) अनुज्ञमीतील मजकुर व नियम शर्ती आणि अटी –

शहरातील विविध प्रकरच्या व्यवसायांना महा. महा. अधिनियम १९४९कलम ३१३, ३७६, ३८६, ३८७, ३९२, ४८१ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ आणि प्रिव्हिशन ॲन्ड कंट्रोल ऑफ पोल्युशन ॲक्ट १९७४ व १९८१ आणि ध्वनि प्रदुषण (नियंत्रण व नियम) २००० व २०१७ अंतर्गत असलेल्या तरतुदी व नियमानुसार परवाना आणि ना हकरत प्रमाणपत्र देणेचा समावेश करणेत येईल. महा. महा. अधिनियम १९४९ चे कलम ३८६ (२) नुसार देणेत आलेल्या अनुज्ञमीमध्ये व सध्या प्रचलित अनुज्ञमीमध्ये जो मजकुर समाविष्ट आहे त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता नाही. त्या शर्ती व अटी अनुषंगिक व्यवसायांना जशाच्या तश्या लागु राहतील मात्र सदर मजकुराव्यतिरीक्त त्यामध्ये खालील शर्ती व अटींचा समावेश होणे गरजेचे आहे. सदरच्या शर्ती, अटी व कागदपत्रे ही सध्या मंजुर असलेल्या परवाना पात्र व्यवसायांना ही लागु राहतील.

१) परवाना धारण केलेली जागा म.न.पा. चे विकास नियंत्रण नियमावली/आराखड्यानुसार अंशतः अथवा पुर्णतः बाधित होत असल्यास ती म.न.पास आवश्यक असेल त्या वेळी परवाना धारकाने विनाअट म.न.पा. चे कब्जात दिली पाहिजे. अशावेळी जागा कब्जात घेतली असेल त्या आर्थिक वर्षापासून सदर परवाना रद्द समजण्यात येईल.

२) व्यवसाय ठिकाणी जिवित व वित्त हानीच्या दृष्टीकोनातून अग्नि सुरक्षा अधिनियम २००६ अंतर्गतच्या तरतुदीनुसार अग्नि सुरक्षा विषयक कयमस्वरुपी योग्य ती उपकरणे ठेवणे बंधनकारक आहे.

३) परवाना धारकाने सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने व्यवसाय जागेमध्ये व परिसरात योग्य ती व्यवस्था ठेवली पाहिजे.

४) परवाना धारकाने लिहून दिलेल्या हमीपत्रातील शर्ती व अटीस आधीन राहून परवाना दिला असे.

५) परवान्याच्या मुदतीत काही काळ धंदा बंद असर परवाना तहकूब केला आणि त्यामुळे परवाना काढून घेतला तर परवाना काढून घेतलेल्या मुदतीची परवाना फी परत दिली जाणार नाही/ मागणार नाही.

६) सोलापूर महानगरपालिकेने सदरचा परवाना रद्द केलेस त्याविरुध्द न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार मला राहणार नाही.

७) परवाना धारण करणाऱ्या व्यवसायाची जागा रिकामी करावयाची असेल अगर पोट भाड्याने द्यावयाची असेल अगर ताबा सोडावयाचा असेल तर त्याप्रमाणे त्याने आपला इरादा संबंधित खात्याकडे नावडलोय लेखी स्वरूपात कळविला पाहिजे.

८) परवाना धारण करणाऱ्याने आपला व्यवसाय अगर कृती परवान्यावर नमूद केलेल्या जागेच्या बाहेर अगर सार्वजनिक रस्त्यावर इतस्त: करु नये.

९) परवाना धारण करणाराने परवाना अधिकारी यांनी वेळोवेळी कळविल्याप्रमाणे परवाना दिलेल्या जागा मालमत्ता व आरोग्य यांना धोका किंवा उपसर्ग पोहोचणार नाही किंवा शेजारील नागरिकांना अगर जनतेला त्रास उपद्रव अथवा गैरसोय होणार नाही अशा प्रकारची योग्य व कार्यक्षम साधने वापरली पाहिजेत अगर उपाय योजना केल्या पाहिजेत.

१०) मानवी जिवितास, मालमत्तेस किंवा आरोग्यास धोका पोहोचेल अगर उपद्रव होईल. अशा रीतीने परवाना धारण करणाऱ्याने परवाना दिलेली जागा वापरली किंवा व्यवसाय चालू ठेवला असे परवाना अधिकारी यांना आढळून आल्यास सदरचा परवाना तहकूब केला जाईल.

११) परवान्यातील नियम शर्ती व अटींचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. सदर नियम शर्ती व अटींचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास व्यवसायिकाचा परवाना तहकूब व रद्द करुन काढून घेण्यात येईल.

१२) व्यवसायिकांनी त्यांच्या व्यवसायाकरीता अनुषंगिक कायद्या अंतर्गतचे आवश्यक असणारे इतर शासकिय कार्यालयाकडील दाखले, ना.हr.प. इ. घेणे बंधनकारक आहे.

१३) परवाना धारण करणारास महापालिका आयुक्त यांच्या परवानगीशिवाय ज्या व्यवसायास परवान्याची आवश्यकता आहे असा दुसरा व्यवसाय अगर कृतीजागेत करता येणार नाही.

१४) म.न.पा. वेळोवेळी जी परवाना फी ठरवेल ती भरणेस मी तयार आहे. तसेच म.न.पा. ने दिलेल्या परवान्याची मुदत संपताच तो नुतनीकरण करणेचे जबाबदारी पुर्णपणे माझी राहिल. मी तसे न केलेस माझा व्यवसाय विनापरवाना समजून म.न.पास त्यावर नियमानुसार कारवाई करण्याचे अधिकार राहिल त्यावेळी सुचना अगर नोटीस देण्याची आवश्यकता नाही.

१५) खाद्य पदार्थ विषयक व अन्य परवान्यासाठी अग्नि सुरक्षा प्रतिबंधक उपाय योजना अधिनियम २००६ अंतर्गत आवश्यक ती कागदपत्रे व प्रिव्हिशन अॅन्ड कंट्रोल ऑफ पोल्युशन अॅक्ट १९७४ व १९८१ आणि ध्वनि प्रदूषण (नियंत्रण व नियम) २००० व २०१७ अंतर्गत तरतुदी नमूद नियम शर्ती व अटी बंधनकारक राहतील.

१६) परवाना पात्र व्यवसायापासून शेजारील व परिसरातील नागरिकांना ध्वनी, वायू इ. प्रदुषण विषयक उपद्रव त्रास होवू नये याबाबतच्या सर्व उपाययोजना व्यवसाय ठिकाणी करणेत याव्यात. याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास आणि त्यामध्ये तथ्य आढळून आल्यास संबंधितांचा परवाना निलंबित अथवा/रद्द करणेत येईल.

१७) तात्पुरते परवाना धारक व्यवसायिकांनी त्यांना ज्या कालावधी करीता तात्पुरता परवाना देणेत आलेला आहे, तो कालावधी समाप्ती नंतर सदरचा तात्पुरता परवाना रद्द समजणेत येईल. या परवाना धारकांनी नमुद शर्ती, अटी व नियमांचे पालन करणे बंधनकारक राहिल. तसेच तपासणीमध्ये नियमांचे पालन केले नसल्याचे संबंधित अधिकारी, कर्मचारी यांचे निदर्शनास आल्यास तात्काळ परवाना रद्दची कारवाई केली जाईल.

१८) सोलापूर महानगरपालिका प्रशासनाने वेळोवेळी आवश्यकतेनुसार आणि व्यवसाय प्रकाराप्रमाणे मागणी केलेले कागदपत्रे व शर्ती, अटी, नियम सर्व संबंधित व्यवसायिकावर बंधनकारक राहतील.

तरी उपरोक्त नमुद प्रमाणे सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये नव्याने विविध प्रकारच्या व्यवसायांना परवाना देणेची कार्यपध्दती अवलंबिणेकरीता धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. सदर निर्णयानुसार सोलापूर महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होणार आहे. शहरातील विविध प्रकारचे व्यवसाय परवानापात्र व्यवसाय करुन उपविधीतील नियम क्र.२ (ई) मध्ये दुरुस्ती करुन महा. महा. अधिनियम १९४९ कलम ३१३, ३७६, ३८६, ३८७, ३९२, ४८१ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत समावेश करणे आवश्यक आहे. त्याकरीता सादर प्रस्तावातील व्यवसायाकरीता आवश्यक कागदपत्रे, अनुज्ञप्ती मागणी अर्जानुसार कार्यालयाने करावयाची कार्यवाही, व्यवसायांचे परवाना शुल्क दर, अनुज्ञप्ती नियम, शर्टी व अटी इत्यादी बाबत धोरणात्मक मान्यता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविणे आवश्यक आहे परंतू मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे धोरणात्मक मान्यतेस्तव पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.१३/०९/२०२२ ने आलेले **प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
**नगरसचिव**
**सोलापूर महानगरपालिका**

सोलापूर महानगरपालिका * मा. प्रशासक कार्यालय

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
**प्रशासक**
**सोलापूर महानगरपालिका**

# सोलापूर महानगरपालिका
## प्रशासक ठराव
## विषय क्र.९९ ठराव क्र.९९ दिनांक. १६/०९/२०२२
## (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )



महाराष्ट्र रिकाम्या जमिनी अधिनियम १९७५ च्या कायद्याप्रमाणे गलिच्छ वस्ती सुधारणा योजनेमध्ये जाहीर करण्यात आलेल्या झोपडपट्टीवासियांकडून सेवा आकार, भुईभाडे, प्रशासकीय कर इ. वसुल करणेबाबत शासनाने वेळोवेळी मार्गदर्शन तत्वे ठरवून दिलेली आहेत. यासंदर्भामध्ये शासनाने सुधारीत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित केलेले आहेत.

मा. महाराष्ट्र शासन गृहविभाग शासन निर्णय क्रमांक गवसु १२२०/प्र.क्र. २०४(१) झोपसु-१, मंत्रालय, मुबई -३२ दिनांक ११ जूलै,२००१अन्वये दिनांक १ जानेवारी १९९५ पर्यत अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीतील झोपडीधारकांना ओळखपत्र (फोटोपास) देण्याबाबत शासनाचे सुधारित धोरणाबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये पा.नं.७ वर बाब क्र.६ (ब) पात्र झ ोपडपट्टीवासियांना ओळखपत्र देताना दरमहा पुढीलप्रमाणे सेवाशुल्क, प्रशासकिय आकार व भुईभाडे आकारावे व ते दिनांक १-१-१९९५ पासून एकत्रित शुल्क म्हणून वसूल करण्यात यावे. यामध्ये १) सेवाशुल्क ४० टक्के २) प्रशासकीय आकार २० टक्के आणि ३) भुईभाडे ४० टक्के याप्रमाणे राहील. या एकत्रित शुल्कातील विविध बाबींची टक्केवारी खालीलप्रमाणे राहिल असे दर्शविण्यात आलेले आहे.

| ओळखपत्राचा प्रकार | क्षेत्र | नुकसान भरपाई (एकत्रित) दरमहा | शेरा |
|---|---|---|---|
| निवासी | २२५ चौ.फु. पर्यत | रू. ५०/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रूपये ०.५० प्रति चौ. फूट दरमहा. |
| सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक | -------------------- | दरमहा रूपये ०.२५ पैसे प्रति चौ. फूट | --------- |
| संयुक्त | २२५ चौ. फूट | रूपये १००/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रूपये ०.७५ प्रति चौ. फूट दरमहा |
| अनिवासी | २२५ चौ. फुट पर्यत | रूपये १५०/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी रूपये १/- प्रति चौ. फूट दरमहा |

वर नमूद तक्त्याप्रमाणे उक्त आदेशामध्ये नमूद बाब क्र ६ क बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राव्यतिरिक्त अन्य महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील सेवाशुल्क इत्यादी यांचा दर वर नमूद केलेल्या दराच्या अनुक्रमे ५० टक्के व २५ टक्के राहील असे नमूद आहे. याचाच अर्थ बृहन्मुंबई महानगरपालिका व्यतिरिक्त महानगरपालिका क्षेत्रात ५० टक्के दर राहील असा होत आहे. त्यामुळे सोलापूर महानगरपालिकेसाठी वरील तक्त्यानूसार सेवाशुल्क इत्यादी दर निश्चित करून कार्यवाही ठेवणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२९ अन्वये वरील तीन पैकी दोन बाबी मालमत्ता करात मोडत नाहीत. त्यामुळे गवसु विभागामार्फत सदर कर वसुली करण्यात आलेली नाही.

परंतु कामाची सुसुत्रता आणि कार्यालयीन कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने सदर बाबींची कर वसूली ही आकारणी व वसुली अधिकारी (गवसु) या कार्यालयामार्फत करणे आजला मनपाच्या आर्थिक हिताच्या व नियोजनाच्यादृष्टीने योग्य वाटते. कारण प्रत्येक मिळकतींच्या बिलामध्ये या बाबीची नोंद होऊन वसूल होते. तसेच गवसु अंतर्गत ज्या मिळकतीचे कर निर्धारण अधिनियमातील तरतूदीनुसार करण्यात आले नाही. त्यांचे देखील कर निर्धारण या अगोदर मंजूर प्रचलित असलेल्या दराने आकारणी करणेस मान्यता देणे गरजेचे आहे. तसेच सदर कार्यवाही करताना उक्त अधिनियमातील कलम १५० (अ) मधील तरतूदीनुसार सहा वर्षाच्या पूर्वलक्षी प्रभावाने आकारणी करणेस मान्यतेकामी सादर करणेत येत आहे.

वरील शासन निर्णयातील बाब क्र ७ मध्ये सेवाशुल्क, भुईभाडे व प्रशासकीय आकार (एकत्रित शुल्क वसूली) बाबत झोपडपट्टीमध्ये महानगरपालिका सेवा पुरवित असल्यामुळे सेवाशुल्क त्यांनीच वसुल करून त्यांच्याकडे जमा करावे असे नमूद आहे.

दरम्यान सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ या सालाचे स्थानिक निधी लेखापरिक्षण करण्यात आले होते त्यामध्ये आक्षेपातील परिच्छेद क्र.८५ मध्ये सेवाकर व ८६ नुसार भुईभाडा, प्रशासकीय शुल्क वसूल होत नसल्याने तो वसुल करणेविषयी आक्षेपात नमूद करण्यात आलेले आहे. त्यावेळी चर्चेच्या अनुषंगाने सदरची बाब ही नगर अभियंता व भूमि व मालमत्ता विभागाशी निगडीत असल्याचे कळविणेत आले. मात्र त्याचवेळी सदर दोन्ही शुल्क हे कामाच्या सुसुत्रतेसाठी गवसु वसुली विभागाकडून करण्यात यावे असे सूचित करण्यात आलेले आहे. त्यामुळे वरील आक्षेपातील परिच्छेद क्र.८६ नुसार सन दिनांक १-४-२०१५ पासून प्रशासकीय कर,भुईभाडे वरील तक्त्यात नमूदप्रमाणे वसुल करणेस मान्यता देणे तसेच आक्षेपातील परिच्छेद क्र. ८५ नुसार ज्या मिळकतदारांकडून फक्त सेवाकर वसूल करण्यात येते त्यांना या करासोबत नियमानुसार प्रचलित दराने कराची आकारणी करणेस तसेच ज्या मिळकतदारांना नियमानुसार कराची आकारणी चालू आहे त्यांना मागील तक्त्यात नमूद प्रमाणे एकत्रित शुल्क दि.०१/०४/२०१५ पासून लागू करणेस, तसेच ज्या मिळकतीचे कर निर्धारण झालले नाही त्याचे नव्याने कर निर्धारण करणेस महराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५० (अ) नुसार सहा वर्षाच्या पूर्व लक्षी प्रभावाने आकारणी करणेस प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभा कडे मान्यतेस्तव पाठविणे आवश्यक आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांच्याकडे मान्यतेस्तव पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.१६/०९/२०२२ ने आलेले **प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रत्येक झोपडपट्टीचे मोजमाप करून त्यामध्ये शासकिय जागा, खाजगी जागा, मनपाचे जागेवर असलेल्या झोपड्यांची विभागणी करून पूरवणी बिले देण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका